# मुंबई अल कायदाच्या हिटलिस्टवर



## कडक बंदोबस्त कायम – मारिया

**मुंबई** : 'अल कायदा' या दहशतवादी संघटनेने दिलेली धमकी ही खरी असून त्या दृष्टीने सर्व बाबतीत खबरदारी घेण्यात आल्याची ग्वाही मुंबईचे पोलीस आयुक्त राकेश मारिया यांनी दिली. गणेशोत्सवादरम्यान आयोजित केलेला बंदोबस्त यापुढेही काही काळ राहणार असून संशयित दहशतवाद्यांचा शोध घेण्याच्या कामात कोणतीही कसर ठेवली जाणार नाही. मारिया यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली.



दोन आठवड्यांपूर्वी 'अल कायदा' या दहशतवादी संघटनेने व्हिडीओ व सोशल मीडियाद्वारे प्रसिद्ध केलेल्या सिडीजमध्ये भारतावर हल्ला करणार असल्याची धमकी दिली होती. भारतातील अनेक तरुण आमच्या संघटनेत सामील होत असल्याचा दावा या संघटनेने प्रामुख्याने केला होता. ही धमकी खरी असून त्या पार्श्वभूमीवर शहरभर खबरदारीचे व्यापक उपाय योजले असल्याचे मारिया यांनी सांगितले. गणेशोत्सवाच्या काळातील पोलीस बंदोबस्त यापुढेही कायम राहणार असून नाकाबंदी, हॉटेल्स तसेच गेस्ट हाऊसेसच्या तपासणीच्या कामाला अग्रक्रम देण्यात आला आहे. बॉलीवूडमधील श्रीमंत निर्माते, तारे-तारकांची माहिती अंडरवर्ल्डच्या टोळीप्रमुखांना देणाऱ्या लोकांवर यापुढे पोलिसांची करडी नजर राहणार असल्याचे ते म्हणाले.

# जास्त वेग, जास्त विमा हप्ता

**मुंबई** : गाडी वेगात चालवणे हा अनेकांचा छंद असतो, मात्र त्यांच्या बेदरकार गाडी चालवण्याने अनेकदा अपघात घडतात. त्यामुळे बेदरकार गाडी चालवणाऱ्या चालकांवर आता विमा कंपन्या 'ब्रेक' लावण्याच्या तयारीत असून अशा चालकांना अधिक विमा हप्ता भरावा लागणार आहे. यासाठी लवकरच 'मोटर व्हेईकल अँड ट्रॅफिक सेफ्टी लॉ'मध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात येणार आहेत.

आजवर अनेक अपघातांमध्ये चालकच जबाबदार असल्याचे दिसून आले असल्यामुळेच कायद्यात हा बदल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. पुढील एक ते दोन वर्षात चालक आणि त्यांनी केलेल्या गुन्ह्यांसंदर्भात सर्व तपशील रेकॉर्ड करण्यात येणार आहे. त्याचा तपशील मध्यवर्ती डाटाबेसच्या माध्यमातून ऑनलाईन उपलब्ध असेल.

# दिल्ली विधानसभा विसर्जित करा

## अरविंद केजरीवाल नायब राज्यपालांना भेटले ▌ घोडेबाजाराची चित्रफीत केली सादर

**नवी दिल्ली** : दिल्लीत सरकार स्थापण्यासाठी भाजपला आमंत्रण देण्यासाठीचे राष्ट्रपतींना पाठविलेले पत्र मागे घेण्याचा आग्रह आम आदमी पक्षाने (आप) दिल्लीचे नायब राज्यपाल नजीब जंग यांच्याकडे बुधवारी केला. याचवेळी दिल्ली विधानसभा विसर्जित करून नव्याने निवडणूक घेण्याची मागणी 'आप'ने केली आहे.



अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली 'आप'च्या शिष्टमंडळाने नजीब जंग यांची बुधवारी सकाळी भेट घेतली. दिल्लीतील सत्तेचा तिढा सोडविण्याविषयीच्या समस्या 'आप' नेत्यांनी राज्यपालांसमोर मांडल्या.

या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना 'आप'चे नेते मनीष सिसोदिया म्हणाले की, आम्ही केलेल्या एका स्टिंग ऑपरेशनची चित्रफीत (सीडी) राज्यपालांना सुपूर्द केली. भाजपद्वारे ४ कोटी रुपयांत आमचे आमदार विकत घेण्यासंबंधीची दृश्ये यात आहेत. ही सीडी आवर्जून पहा, अशी विनंती आम्ही राज्यपालांना केली. एवढेच नव्हे, तर दिल्लीत सत्ता स्थापण्यासाठी भाजपला आमंत्रित करण्याविषयी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांना पाठविलेल्या पत्रावर पुन्हा एकदा विचार करण्याचा आग्रह आम्ही त्यांच्याकडे केल्याचे सिसोदिया यांनी सांगितले. आमदारांचा घोडेबाजार करण्यात भाजप लिप्त असल्याचा आरोप सिसोदिया यांनी केला. त्यांनी पुढे नमूद केले की, आमदारांचा घोडेबाजार करून भाजपने दिल्लीतील सत्ता काबीज केली तरी राज्यातील समस्या काही सुटणार नाहीत. अशा प्रकारचे सरकार जनतेवर एक प्रकारे ओझे बनून राहील. तसेच असे सरकार स्थापन करणे म्हणजे जनतेचा छळ करणे होय.

दरम्यान, दिल्ली विधानसभा विसर्जित करण्याची मागणी 'आप'ने जंग यांच्याकडे केली. गरज भासल्यास घोडेबाजाराचे आणखी पुरावे सादर करू, असे सिसोदिया यांनी म्हटले आहे.

# वनजमिनींवरील घरे होणार हक्काची

## सर्वोच्च न्यायालयातील याचिका घेतली मागे

**नवी दिल्ली** : वनजमिनींवर अतिक्रमण करून राहत असलेल्या रहिवाशांचा त्या जमिनींवरील हक्क अखेर राज्य सरकारने मान्य केला आहे. वनजमिनींवर राहणाऱ्या रहिवाशांच्या हक्काला आव्हान देणारी सर्वोच्च न्यायालयातील याचिका बुधवारी सरकारने मागे घेतली. मुंबई-ठाण्यातील रहिवाशांना झोपू आणि क्लस्टर योजनांचा लाभ दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी राज्य सरकारने वनजमिनींवरील रहिवाशांनाही खूश केले आहे.

वनजमिनींवरील घरे आता काही औपचारिकता केल्यानंतर हक्काची होणार आहेत. मुंबईतील १० ते १२ लाख रहिवाशांना याचा फायदा होईल.मुंबईतील अनेक भागातील जागा वनजमीन म्हणून राखीव आहे. मात्र या जागांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करून घरे बांधण्यात आली आहेत. पालिका तसेच सरकारने प्रयत्न करून वर्षानुवर्षे झालेले आक्रमण रोखता आले नाही. या रहिवाशांचा मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार करावा, अशी मागणी होऊ लागली, तसेच अनेक राजकीय पक्ष आणि संघटना त्यांच्या बाजूने उभ्या राहिल्या. यामुळे हे सर्व प्रकरण अखेर मुंबई उच्च न्यायालयात गेले. मुंबई उच्च न्यायालयाने रहिवाशांचा दावा मान्य करून वनजमिनींवरील अतिक्रमण काढण्याचे आदेश दिले. यामुळे हवालदिल झालेल्या रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला. वनजमिनींवरील रहिवाशांचा हक्क मान्य केला. रहिवाशांना फार मोठा दिलासा मिळालेला असतानाच राज्य सरकारने मात्र या निर्णयाच्या विरोधात भूमिका घेतली. निर्णयाचा पुनर्विचार करण्यासाठी वनविभागातर्फे न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या पुनर्विचार याचिकेवर सुनावणी सुरू असतानाच वनविभागाने मात्र आता अचानक माघार घेतली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अगोदर दिलेला निर्णय मान्य असल्याचे म्हणत पुनर्विचार याचिका बुधवारी मागे घेतली. वनविभागाच्या या भूमिकेमुळे वनजमिनींवर राहणाऱ्या रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांची घरे आता हक्काची होणार आहेत. मुंबईतील १० ते १२ लाख लोकांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. मुलुंड, भांडुप, कांदिवली, बोरिवली आदी भागांमध्ये वनजमिनींवर मोठ्या प्रमाणावर रहिवासी आहेत. त्यांच्या घरांवर अनधिकृतचा शिक्का असूनही अनेक वर्षांपासून ते याच घरांमध्ये राहत आहेत. आता त्यांची घरे अधिकृत होण्याचा महत्त्वाचा मार्ग मोकळा झाला आहे.

# लाचप्रकरणी दोन पोलीस शिपायांवर गुन्हा दाखल

**पुणे : प्रतिनिधी**

वाळूची वाहतूक करणाऱ्या दोन्ही ट्रकवर कारवाई न करण्यासाठी पाच हजार रुपयांची मागणी केल्याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्याच्या अंकित मांडवगण फराटा येथील पोलीस दूरक्षेत्रातील दोन पोलीस शिपायांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अमोल प्रताप गवळी आणि संतोष नंदकुमार कुंभार अशी गुन्हा दाखल केलेल्या आरोपींची नावे आहेत. हे दोघेही पोलीस शिपाई शिरूर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या मांडवगण फराटा या पोलीस दूरक्षेत्र येथे नेमणुकीस आहेत. या भागातून तक्रारदार हे वाळूची त्यांच्या ट्रकद्वारे वाहतूक करतात. या ट्रकची मांडवगण फराटा भागातून वाहतूक चालू ठेवण्यासाठी प्रत्येकी अडीच हजार अशी पाच हजार रुपयांची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली होती. ही लाच रक्कम आरोपींनी एका खासगी व्यक्तीक डे देण्यास सांगितले होते. मात्र, या व्यक्तीने काही कारणास्तव लाच रक्कम स्वीकारली नाही. मात्र, या दोघांनी लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याने पथकाने या दोघांवर लाचेचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

# मानहाणी प्रकरणी सुब्रमण्यम स्वामींना समन्स

**चेन्नई** : तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जे. जयललिता यांनी अब्रुनुकसानीचा दावा केल्यानंतर चेन्नई न्यायालयाने ज्येष्ठ भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांना बुधवारी समन्स बजावले आहेत. येत्या ३० ऑक्टोबर रोजी किंवा त्या अगोदर न्यायालयात हजर राहण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

चेन्नई न्यायालयाचे प्रधान सत्र न्यायाधीश औदिनाथ यांनी प्रस्तुत खटल्यावर बुधवारी सुनावणी केली. यावेळी सुब्रमण्यम स्वामी यांना समन्स जारी करण्यात आले. याबरोबरच तामिळी दैनिक 'दिनामलार', 'दि टाइम्स ऑफ इंडिया' आणि इतरांनाही समन्स बजावण्यात आले.

या सर्व दैनिकांनी सुब्रमण्यम स्वामी यांचे मच्छीमारांच्या संदर्भातील सूतोवाच प्रकाशित केले होते. त्यानंतर राज्य सरकारने या दैनिकांचे संपादक, मुद्रक आणि प्रकाशक यांच्याविरुद्ध मानहानीचा खटला भरला होता. त्यावर सुनावणी झाली असता चेन्नई न्यायालयाने सुब्रमण्यम स्वामी आणि यांना समन्स बजावत हजर राहण्याचे आदेश दिले.

# पिंपरीत होणार जगातील पहिले होमिओपॅथी रुग्णालय

**पान १ वरून...**दैनिक पुण्यनगरीच्या संपादकीय विभागाशी डॉ. निकम यांनी संवाद साधला. याप्रसंगी संपादक राही भिडे, सहसरव्यवस्थापक राजेश वरळेकर उपस्थित होते.

भविष्यात तिसरे महायुद्ध जरी झाले तरी होमिओपॅथी उपचारपद्धती नामशेष होणार नाही, असे मत डॉ. निकम यांनी व्यक्त केले. अडीचशे वर्षांपूर्वीचे हे शास्त्र आता पूर्णपणे विकसित झाले असून, जगभरात त्याला मान्यता मिळाली आहे. या उपचार पद्धतीमध्ये तब्बल ७ हजार औषधे उपलब्ध असून, औषधाचे जेवढे सूक्ष्मीकरण केले जाते, तेवढा औषधाचा प्रभाव वाढीस लागतो. ॲलोपॅथी उपचार पद्धतीमध्ये औषधांचा प्रभाव हा तात्पुरत्या स्वरूपाचा असतो, मात्र होमिओपॅथीमध्ये रोगाच्या मुळाशी जाऊन त्याचा समूळ नाश करणे हे या उपचार पद्धतीचे वैशिष्ट्य. या उपचार पद्धतीचा अवलंब करणाऱ्यांमध्ये सध्या लक्षणीय वाढ होत असताना ॲलोपॅथीचे डॉक्टर होमिओपॅथीविरोधात जाणीवपूर्वक अपप्रचार करीत आहेत, अशी खंत डॉ. निकम यांनी व्यक्त केली. होमिओपॅथीचे वेगळेपण म्हणजे, रुग्णाची देहबोली, स्वभाववैशिष्ट्ये, सवयी यावर उपचार पद्धती ठरविली जाते. होमिओपॅथीची औषधे ही ॲलोपॅथी औषधांपेक्षा तुलनेने स्वस्त आहेत. सध्या होमिओपॅथीचे डॉक्टरही स्वार्थापोटी नफेखोरीचे उद्दिष्ट समोर ठेवून ॲलोपॅथीची औषधे रुग्णांना देत आहेत. ही अनिष्ट प्रथा वैद्यकीय व्यवसायास मारक असून, यामुळे होमिओपॅथीचे अतोनात नुकसान होत आहे. वृत्तपत्रांमधून लेखवजा जाहिरातींमधूनही अनेकांची दिशाभूल केली जात आहे. अर्धवट माहितीवर घेतलेली औषधे कोणत्याही व्यक्तीस अत्यंत धोकादायक ठरू शकतात. नेहमी निष्णात व अनुभवी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधे घेणे आरोग्याच्या दृष्टीने हितकारक असते. या शास्त्रात जगात उपलब्ध असलेल्या कोणत्याही वस्तू, वनस्पतींपासून औषधे तयार केली जाऊ शकतात. या शास्त्रात शरीरातील नैसर्गिक चेतनाशक्तीला चालना देण्याचे काम केले जाते. ॲलोपॅथी औषधांचे दूरगामी परिणाम अत्यंत घातक ठरू शकतात. होमिओपॅथीमध्ये मात्र कोणत्याही दुष्परिणामांना रुग्णास सामोरे जावे लागत नाही. अमेरिका, युरोप, तसेच आफ्रिका खंडातील विकसनशील देशांत ही उपचार पद्धती सध्या चांगलीच प्रचलित होत आहे. भारतातही याचे प्रमाण वाढत असून, ४० टक्के लोकसंख्या या उपचार पद्धतीस पसंती देत आहे. केवळ आजारांवरच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही होमिओपॅथीचा अवलंब केल्याने खेळाडूंच्या कामगिरीत लक्षणीय सुधारणा होत असल्याची माहिती डॉ. निकम यांनी दिली.

### शासकीय स्तरावर उदासीनता

होमिओपॅथीला चालना देण्यासाठी ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, रशियासारख्या देशांमध्ये शासकीय स्तरावर धोरण राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात मात्र होमिओपॅथीबाबत शासकीय स्तरावर उदासीनता असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. होमिओपॅथी उपचार पद्धती शिकवणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांना अधिक संख्येने मान्यता देणे ही काळाची गरज आहे. होमिओपॅथीवर डॉ. निकम यांनी एकूण सात पुस्तके लिहिली असून, या विषयावर अधिक लिखाण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### प्राण्यांवरही गुणकारी

विविध प्राण्यांवर केलेल्या प्रयोगाअंती मनुष्याप्रमाणेच प्राण्यांवरही होमिओपॅथी उपचार पद्धती गुणकारी असल्याचे सिद्ध झाले आहे. यामुळेच आगामी काळात पशुवैद्यकीय शास्त्रातही होमिओपॅथीमुळे क्रांती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# रंगनाथ देशपांडे यांचे निधन



**देगलूर** : येथील तहसील कार्यालयातील निवृत्त पेशकार रंगनाथ माणिकराव देशपांडे यांचे सोमवारी पहाटे निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. 'छोटू देशपांडे' या नावाने ते सर्वपरिचित होते. उत्तम गायक आणि दिलखुलास स्वभाव या गुणांमुळे त्यांनी अनेकांना आपलेसे केले होते. त्यांच्या अंत्यविधीला सर्व थरातील नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, स्नुषा, दोन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे.




# ठाणे महापौरपदी शिवसेनेचे संजय मोरे

## मनसेची तटस्थ भूमिका सेनेच्या पथ्यावर

**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या १७ व्या महापौरपदी अपेक्षेप्रमाणे शिवसेनेचे संजय मोरे आणि उपमहापौरपदी सेनेचेच राजेंद्र साप्ते हे विजयी झाले. या निवडणुकीचे वैशिष्ट म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यात तटस्थ भूमिका घेऊन सेनेला अप्रत्यक्षपणे मदतच केली. शिवाय महत्त्वाच्या महापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेसच्या तीन नगरसेवकांसह लोकशाही आघाडीला पाठिंबा देणारा एक अपक्ष नगरसेवक ऐन मतदानाच्या वेळी हजर न राहिल्याने त्यांना मतदानापासून वंचित राहावे लागले. परिणामी आघाडीच्या उमेदवाराला त्यांच्या पक्षाचीही पुरेशी मते मिळू शकली नाहीत व ठाणे महापालिकेवर मागील २२ वर्षांपासून असलेली सेनेची सत्ता कायम राहिली.

बुधवारी ठाणे महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात झालेल्या महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीसाठी मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी शैला ए. या निवडणूक अधिकारी म्हणून उपस्थित होत्या. बुधवारी सकाळी सव्वाअकरा वाजता निवडणुकीच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रथम महापौरपदाची निवडणूक घेण्यात आली. याकरिता सेनेचे संजय मोरे आणि काँग्रेसचे विक्रांत चव्हाण यांचे दोन उमेदवारी अर्ज आले होते.

### गैरहजर नगरसेवकांवर कारवाई करणार : चव्हाण

ठाणे महापालिका महापौर आणि उपमहापौर निवडणुकीत रवींद्र फाटक यांचे समर्थक नगरसेवक राजा गवारी, मीनल संखे, दीपक वेतकर आणि मनप्रीत शान हे अनुपस्थित होते. या अनुपस्थित नगरसेवकांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती काँग्रेसचे गटनेते आणि महापौरपदाचे उमेदवार विक्रांत चव्हाण यांनी दिली आहे.

# पान १ वरून...

## आचारसंहितेपूर्वीची मंत्रालयात लगबग

वर्णी लावून घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही धावपळ सुरू होती. मंत्रालयात फेरफटका मारताना बुधवारी हेच चित्र दिसत होते.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लागेल याचा अंदाज असल्याने ऑगस्ट महिन्याच्या आरंभापासूनच मंत्रालयात आपली कामे मार्गी लावण्यासाठी बडे बिल्डर्स, लायझनिंग ऑफिसर्स आणि विविध कंत्राटदार यांची वर्दळ वाढू लागली होती. या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तर कमालीच्या वेगाने लगबग सुरू झाली. सचिव दर्जाचे अधिकारीही रात्री उशिरापर्यंत कार्यालयात थांबून टेबलावरील फायली हातवेगळ्या करीत होते. हा सिलसिला आजही उशिरापर्यंत सुरूच राहिला.

भारत निवडणूक आयोगाच्या तीनही आयुक्तांची मंगळवारी बैठक झाली. त्याआधी आयोगाने पत्रकारांसाठी ॲलर्ट दिल्यानंतर तर मंत्रालयातील प्रमुख खात्यांमधील हालचालींना आणखीनच गती आली. आज हमखास निवडणूक आयोग विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करेल आणि संध्याकाळीच आचारसंहिता जारी होईल, याची दाट शक्यता असल्याने बुधवारी तर मंत्रालयाभोवतीच्या सर्व रस्त्यांवर आलिशन गाड्या रांगेने उभ्या होत्या. या आलिशान गाड्यांमधून सुटाबुटात आलेले नामवंत बिल्डर, मोठे कंत्राटदार मंत्रालयात सहा, पाच आणि चार अशा तीनही मजल्यांवर प्रधान सचिव, सचिव यांच्या दालनाबाहेर गर्दी करून होते.

## ...धूम्रपान केल्यास २० हजारांचा दंड?

काही शिफारसी सुचवल्या असून त्यांची अंमलबजावणी झाली तर धूम्रपान, तंबाखू सेवन करणाऱ्यांसोबत या उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्याही चांगल्याच अडचणीत येतील. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान बंदीचा कायदा सहा वर्षांपूर्वी तयार करण्यात आला असून त्यासाठी २०० रुपये दंडाची तरतूद आहे. मात्र कायदा पुरेसा नसल्याने सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे दखलपात्र गुन्ह्यांच्या यादीत टाकून त्यासाठी २० हजार रुपये दंड ठोठावण्याची शिफारस या समितीने केली आहे. सिगारेटची विक्री संपूर्ण पाकिटापेक्षा एक-दोन अशा सुट्या सिगारेटच्या रूपाने अधिक होत असते. किरकोळ विक्रीतील ७० टक्के हिस्सा हा खुल्या सिगारेटचा असतो. त्यामुळे अशी खुली सिगारेट विकण्यास बंदी घालावी. तसेच सिगारेटच्या पाकिटावरील ८० टक्के जागेवर इशाऱ्याचा मजकूर व फोटो छापावा आणि या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या उत्पादकांवर ५० हजार रुपये दंड लावावा, असेही समितीने सुचविले आहे. सिगारेट आणि तंबाखू विक्री-खरेदी करण्यासाठीची वयोमर्यादा १८ वर्षांवरून २५ वर्षे करण्याची शिफारसही समितीने केली आहे. दिल्ली सरकारचे माजी मुख्य सचिव रमेश चंद्रा यांच्या नेतृत्वाखालील समितीने आपला हा अहवाल नुकताच आरोग्य मंत्रालयाला सोपवला आहे. धूम्रपान आणि तंबाखू सेवनाने होणारे दुष्परिणाम आणि कर्करोगाच्या समस्येबाबत मोदी सरकार या शिफारसींबाबत गंभीर असून संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनात या तरतुदींचा समावेश असलेले दुरुस्ती विधेयक सादर केले जाण्याची शक्यता आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांसोबतच या व्यसनांच्या आहारी गेलेल्या नागरिकांवर कठोर कायद्याचा बडगा उगारला जाईल. धूम्रपान आणि तंबाखू सेवनामुळे जगात दरवर्षी सुमारे ५५ लाख लोक मृत्युमुखी पडतात आणि त्यापैकी १० लाखांहून अधिक संख्या भारतातील आहे.

## पुणे मनपा हद्दीतील विकासप्रकल्पांना ...

काळात या गावांमध्ये विविध विकासाचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणावर येत असून, त्यांना मान्यता देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक होते. भविष्यात यातील काही विकसित झालेले भूखंड प्रारूप विकास आराखडा तयार करताना सार्वजनिक सुविधांसाठीदेखील उपयोगी पडू शकतात. हे लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात मंजूर प्रादेशिक योजनेच्या तरतुदीनुसार परवानगी देण्याबाबत प्रक्रिया सुरू ठेवावी, असा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला.

## प्रक्षोभक भाषण : अमित शहांविरोधात आरोपपत्र

दिले होते. मात्र तेव्हा उत्तर प्रदेशचे भाजप प्रभारी असलेल्या शहा यांनी आयोगाला एक पत्र पाठवून भविष्यात प्रक्षोभक भाषा वापरणार नसल्याचे लिखित स्वरूपात आश्वासन दिले होते. या आश्वासनानंतर आयोगाने त्यांच्यावरील बंदी उठवली होती. आता हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून अमित शहा यामध्ये दोषी आढळले तर त्यांना ३ वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागेल. दरम्यान, उत्तर प्रदेशात लोकसभेची एक आणि विधानसभेच्या ११ जागांवर येत्या शनिवारी पोटनिवडणूक होत असून, त्यापूर्वी या आरोपपत्रामुळे अमित शहांच्या अडचणीत भर पडली आहे.

## काश्मिरात मदत, बचाव मोहीम युद्धपातळीवर

वेळेत मदत पोहोचत नसल्याने मोठ्या प्रमाणात नागरिक संतप्त झाले आहेत. या नागरिकांच्या हल्ल्यात एनडीआरएफचा एक जवानही जखमी झाला. दुसरीकडे राज्यातील विविध भागांमध्ये असलेल्या लष्कराच्या छावणीतही जवळपास हजारो सैनिक त्यांच्या कुटुंबीयांसह अडकले आहेत. काश्मिरात आलेल्या या पुराने २०० जणांचा बळी घेतला आहे.

## आघाडी मारणार सत्तेचा चौकार!

पण तरी जनतेने लोकसभा निवडणुकीत वेगळा निकाल दिला. पण आता लोकांच्या लक्षात ती चूक आलेली आहे. पुन्हा चौथ्यांदा लोक आम्हालाच निवडून देतील. अतिशय उत्साहाचे वातावरण आता पक्षात आहे.

'खोटे बोल पण रेटून बोल' या वृत्तीचा वापर करत विरोधी पक्षाचे नेते आमच्यावर बेफाम आरोप करत आहेत. त्यांचे सरकार येणार नाही हे माहीत आहे. त्यामुळेच ते ११ लाख कोटींच्या गैरव्यवहारासारखे आरोप करीत आहेत. राज्याचे बजेट नाही तितका भ्रष्टाचार... हा आकडा कोठून आणला? असा सवाल करतानाच हा प्रकार 'उचलली जीभ लावली टाळ्याला' असा आहे, अशी टीका त्यांनी केली. राज्यापुढे मोठे वीजसंकट आहे. इंडोनेशियाच्या नव्या धोरणामुळे काही प्रश्न उभे राहिले. आपण केंद्राला जबाबदार धरले नाही. कोळसा कमी, अपुरा गॅस, बंद पडलेला दाभोळ प्रकल्प या गोष्टींचा विचार केंद्रानेच केला पाहिजे. हा चार राज्यांचा वीज संकटाचा विषय म्हणून केंद्रानेच मार्ग काढला पाहिजे, असे आपण म्हटले होते, असे उत्तर त्यांनी दिले. केंद्राच्या धोरणामुळे कांदा उत्पन्नावर परिणाम झाला तर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करू, असा इशाराही मुख्यमंत्री चव्हाण यांनी दिला. लव्ह जिहादसारखे प्रश्न उपस्थित करण्याचा योगी आदित्यनाथ याच्यासारख्यांचा प्रचार हा समाजात तेढ वाढविण्याचाच प्रकार आहे, असे ते म्हणाले. जम्मू-काश्मीरमधील पूरस्थतीत महाराष्ट्राचे किती लोक फसले आहेत, याची निश्चित माहिती सरकारकडे नाही. ती त्यांच्या नातेवाईक तसेच परिवारातील लोकांनी सरकारला द्यावी. सर्व लोकांना सुखरूप परत आणण्यासाठी सर्व शक्ती लावू. सरकार कसूर करणार नाही. सरकारने कोटी रुपये आणि पूरग्रस्तांना वाचविण्यासाठी रबरी बोटी पाठविल्या आहेत, असेही ते म्हणाले.

# अहो आश्चर्य... चार अपत्यांना जन्म!

**हिंगोली : प्रतिनिधी**

हिंगोली येथील घटना

हिंगोलीच्या इतिहासात मात्र एका मातेने चक्क चार मुलांना जन्म देवून इतिहास घडविला. हिंगोलीतील माधव मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अशा चार मुलांना जन्म देणारी माता सुरेखा मदन बोक्से या कळमनुरी तालुक्यातील कळमकोंडा येथील आहेत. बुधवारी (दि.१०) पहाटे १.३० वाजता त्या चार मुलांना जन्म देणाऱ्या मातेची प्रसुती झाली असून, बालकांसह मातेची प्रकृत्ती चांगली असल्याची माहिती त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली आहे.

हिंगोली येथील माधव हॉस्पिटलमध्ये कळमनुरी तालुक्यातील कळमकोंडा येथील सुरेखा मदन बोक्से या १ सप्टेंबर रोजी गरोदरपणातील उपचारास्तव दाखल झाल्या होत्या. चार वर्षापुर्वीच त्यांचे मदन बोक्से (कळमकोंडा) यांच्याशी लग्न झाले होते. लग्नानंतर त्यांना उशिरा दिवस गेल्यानंतर हा चार मुलाची निसर्गदत्त देणगी त्यांच्या वाट्याला आली आहे. त्यापैकी एक मुलगा आणि एका मुलीचे वजन हे दीड किलो तर दुसऱ्या एक मुलगा आणि एका मुलीचे वजन एक किलो असे एकूण सर्व मुलांचे वजन पाच किलो आहे. प्रसुती झाल्यानंतर सदर मातेवर माधव हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असल्याची माहिती त्यांच्यावर उपचार करणारे डॉ.सचिन बगडिया व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ.कंचन बगडिया यांनी दिली आहे. मुलांचे वजन कमी असल्याने मात्र चारही आपत्यांना जवळच असलेल्या हिंगोली येथील शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



सर्वांची प्रकृती अगदी ठणठणीत असल्याची माहिती बालरोगतज्ञ डॉ. गोपाल कदम व डॉ. दिपक मोरे यांनी दिली आहे. विशेष म्हणजे किमान एक ते दीड लाख महिलांच्या प्रसुतीत अशी चार मुलांना जन्म देणारी एखादी आश्चर्यकारक घटना घडते, आपत्य जन्माला आल्यानंतर त्यातील काहीजण हे वाचत असतात तर काही हे वाचू शकत नाहीत. परंतु येथे मात्र इतिहास घडविणारी माता सुरेखा बोक्से यांचे चारही आपत्य ठणठणीत असल्याची माहिती अशी माहिती डॉ. कदम यांनी दिली आहे.